**नियमित फौजदारी खटल - ८४८/२०१३**

**नि.४७/क, महा.सरकार /रघुनाथ कांबळे**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – नेमीनाथ रामचंद्र कापसे

वय - ६५

धंदा - व्यापार

राहणार - रुईकर कॉलनी,कोल्हापूर

**<u>सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.ए.एन.डोईफोडे</u>**

माझ्या समक्ष प्रस्तुत गुन्ह्यातील कोणताही निवेदन वा जप्ती पंचनामा झालेला नव्हता. मला आता दि.२६/०५/२०१३ रोजीचे निवेदन व जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. सदर दोन्ही पंचनामे माझ्या समक्ष झालेले नाहीत, परंतू त्यावर अ.क्र.२ वर माझ्या पंच म्हणून सह्या आहेत. सदर दोन्ही पंचनाम्यांना सही ओळखण्यापुरते **नि.४८** व **नि.४९** देण्यात येत आहेत.

(प्रस्तुत साक्षीदार हा वर नमुद पंचनाम्यांवरील आपली पंच म्हणून सही ओळखतो,परंतू सदर पंचनाम्यांबाबत त्यास माहिती नाही असे नमुद करतो. म्हणून सरकारी वकीलांनी सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी त्याचा उलटतपास घेणेची परवानगी मागीतली. एकंदरी हकीकतीचा विचार करता, सदर परवानगी मंजूर करण्यात आली )

**<u>उलटतपास सरकारी विधिज्ञांतर्फे सुरु</u>**

२. मला दि.२६/०५/२०१३ रोजी पोलिसांनी करवीर पोलिस ठाण्यात बोलविले होते, हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी आरोपी क्र.१ रघुनाथ कांबळे हा सदर पोलिस ठाण्यात हजर होता, हे म्हणणे खरे नाही. त्याप्रमाणे पोलिसांनी आम्हा पंचासमक्ष निवदेन पंचनामा लिहिला, हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी सदर आरोपीने पोलिस व

आम्हा पंचांसमक्ष निवदेन दिले की, सांगरुळ येथील ज्या सोनारांना सोने विकले आहे त्या सोनारांची दुकाने दाखवितो व त्यांचेकडून दागिणे काढून देतो, हे म्हणणे खरे नाही. त्याप्रमाणे पोलिसांनी आम्हा पंचासमक्ष निवेदन पंचनामा लिहिला व त्यावर आम्ही पंच म्हणून सह्या केल्या, हे म्हणणे खरे नाही. त्यानंतर आरोपीचे सूचनेनुसार आरोपी सह आम्ही सरकारी वाहनाने यवलूज येथील शुभम ज्वेलर्स या दुकानात गेलो, हे म्हणणे खरे नाही. त्यावेळी आरोपीचे सूचनेनुसार कृष्णात माने या दुकानदाराने ३३ ग्रॅम सोन्याचे गंठण आम्हा सर्वांसमक्ष काढून दिले व तसा जप्ती पंचनामा लिहीण्यात आला, हे म्हणणे खरे नाही. सदर निवेदन व जप्ती पंचनामे हे वस्तुस्थितीप्रमाणेच आमच्या समक्ष झालेले होते म्हणून मी त्यांवर पंच म्हणून सही केलेली होती, हे म्हणणे खरे नाही. सदर पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून का दाखविण्यात आलेले आहे, याचे कारण मला सांगता येत नाही. मी आरोपीस वाचविणेसाठी सत्यवस्तुस्थिती न्यायालयासमोर सांगत नाही, हे म्हणणे खरे नाही.

**आरोपी क्र.२ तर्फे विधिज्ञ एस.ए.गुरु यांनी नाकारला.**

२. फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**दिनांक-०५/०६/२०२६** **मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**